Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- III MARCH 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# मोठी धरणे सामाजिक-आर्थिक परिणाम संदर्भ - पाडळसरे प्रकल्प जि.जळगाव.

**प्रा.डॉ. विष्णू रामदास गुंजाळ, (मार्गदर्शक)**
समाजकार्य महाविद्यालय चोपडा.
**प्रा. दिपक भिवसन सोनवणे**
संशोधक विद्यार्थी
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

**विषयाची पार्श्वभूमी-**

प्राचीन काळापासून भारतीय अर्थव्यवस्था ही नैसर्गिक पडणा-या पावसावर अवलंबून असल्याचे पुरावे इतिहासात मिळतात. जागतिकरणाच्या युगातसुध्दा यात विशेष बदल झाल्याचे जाणवत नाही म्हणून आजही भारतीय अर्थव्यवस्था पावसावर अवलंबून असल्याचे भारताचे प्रधानमंत्री अथवा अर्थमंत्री प्रतिपादन करीत असतात. त्यामुळे प्राचिन काळापासून सिंचन व्यवस्थेकडे लक्ष पुरविले गेले. प्राचिन काळातील पहिले एकछत्री साम्राज्य निर्माण करणारा मौर्य सम्राट चंद्रगुप्त पहिला याने सिंचनाकडे लक्ष पुरवितांना कालवे व पाटबंधारे हे स्वतंत्र्य खाते निर्माण केले तर गुजरातमधील गिरणार यंथे शेतीला पाणी पुरवठा करण्या करीता मोठा तलाव बांधल्याचे पुरावे आढळतात. उत्तरोत्तर गुप्त, वर्धन, तघलक, खिलजी, मोगल, या सर्व भारतीय घराणांनी सिंचन व्यवस्थेकडे लक्ष पुरविल्याचे दिसुन येते.[१]

भारतीची पारतंत्र्याची काळरात्र आता संपली होती १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारतात नव पर्व सुरु झाले ते देशाला मिळालेल्या स्वतंत्र्यांने आठराविश्व द्रारीद्रयाचा आमच्या भूमीस असलेला शार्प आता आमच्या धोरण कर्त्यांना पुसन काढायचा होता. नवा देश उभारायचा होता ही भूमी सुजलाम सुफलाम करायची होती. नियोजनबध्द विकास करण्याविषय माजी पंतप्रधान स्व.पंडीत नेहरु यांचा आग्रह होता. भारतातील पंचवार्षीक धोरणातुन हे श्यक होईल या साठी नियोजन सुरु झाले त्यात देशातील दारिद्रय संपूर्ण दुर करण्या साठी अन्यधान्य वाढले पाहिजे हे सर्वसामान्य माणसालाही वाटत होते त्यासाठी शेतीची उत्पादकता वाढविण्यावर भर देण्यात आला. शेतीचे उत्पादन वाढविण्याचे हुकमी साधन म्हणजे शेतीला पाणी पुरपठा करणे. आणि पाणी पुरवठा करण्याचा हुकमी मार्ग म्हणजे धरण. पुढे भाक्रा नागल सारखे धरणप्रकल्प आखले गेले . भारतातील तीर्थक्षेत्र म्हणून पंडीतजींनी भाक्रा-नांनगलचा गौरव केला. स्वातंत्र्य भारताच्या इच्छाशक्तींचे आणि कर्तूत्वाचे ते प्रतीक झाले.[२]

हरित क्रांतीला आरंभ झाल्यानंतर शेतीला पाणी पुरविण्याचे महत्व वाढले . लहानमोठया नद्यांमधून वाहणारे पाणी किती, लहान-मध्यम -मोठी धरणे बांधून साठविता येईल यावर भर देण्यात आला. कारण भरपूर रासायनिक खते वापरुन संकरित बियांपासून उच्च उत्पादन काढावयाचे तर पाण्याचा वापर भरपूर करता आला पाहीजे याची गरज होती. जितके जास्त रासायनिक खत व जितके जास्त पाणी तीतके उत्पादन जास्त , असे समीकरण पण नियोजनकारांच्या शेतीतज्ज्ञांच्या, प्रशासकांच्या व बागाईतदार शेतक-यांच्या डोक्यात पक्के बसले. धरण कालव्यांतून खेळविलेले पाणी, उसाची शेती व पैसा यांची महाराष्ट्रात शेतक-यांच्या मनात सांगड बसली . सर्वसामान्य जनताही धरणांकडे प्रगतीची मंदीरे, नवी तीर्थक्षेत्रे म्हणून पाहू लागली. मात्र काळ उलटत गेला तसे या विश्वासाला तडे पडू लागले. धरणप्रकल्पांनीजी आश्वासने दिली ज्या आपेक्षा निर्माण केल्या त्यांची पूर्तता होतांना दिसेना .अगदी उलटे परिणामही दिसू लागले. धरणांमुळे विस्थापित झालेल्या लाखोंची दैना अस्वस्थ करु लागली . उत्पादन वाढले तरी त्याचे न्याय वाटप झाल्याचे दिसेना. एकीकडे अन्न धान्याच्या राशी पडत आहेत तर दुसरीकडे कोटयावधी लोकांच्या पोटभर अन्न मिळत नाही, हा विरोधाभास समोर आला . उत्पादन तात्पूरते वाढले तरी लाखो एकर जमीन खारी वा पाणथळ बनून निकामी झाल्याचे चित्र समोर आले. दुष्काळ व पुरांच्या संकटाची तीव्रता कमी झाल्याचा अनुभव आला नाही. अनेक परीणामांची तर पूर्वी कल्पाना आली नाव्हती भूकंपाच्या संभावना वाढल्याचे निदर्शानास आले धरणे झ

ापाटयाने गाळाने भरुन अल्पावधित निकामी होऊ लागल्याचे दृश्य दिसू लागले.

पर्यावरणाची समजही वाढू लागली. निसर्गाच्या व्यवस्थेच्या सहनशक्तीची सीमा ओलांडण्यास कारणीभूत होऊशकणारा हस्तक्षेप अनेक गंभीर परिणामांना जन्म देऊ शकतो आणि त्या हस्तक्षेपांचे औचित्यच संदेहास्पद होते, हे लक्षात आले. नैसर्गिक सांधनसंपत्तीचा -हास व नाश करणा-या हजारो वर्षापासून पोषण देत असलेल्या जमिनीला बरबाद करणा-या लाखो लोकांना आपल्याच देशात निर्वासित करुन कुत्र्याचे जिणे जगायला भाग पाडणा-या, सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण करुन दारिद्रय आणि गुलामीचे पाश घट्ट करणा-या विकासा वर त्या विकासा मागच्या तर्कशास्त्राच्या प्रत्येक गृहीत मान्यतेवर प्रश्नचिन्ह लागले. जिला प्रगती मानले ती प्रगती नसून आपल्या मुळावर उठलेली मायावी शक्ती तर नाही, ही जाणीव अस्वस्थ करु लागली तथाकथीत प्रगतीची मंदीरे म्हणजे लोकांच्या आशा आंकाक्षांची स्वांतत्र्य आणि सन्मानाची थडगी तर नव्हेत असे वाटू लागले एकेकाळी संबोधलेले तीर्थस्थाने ही कबरस्थाने ? असा संतप्त प्रश्न विचारण्याची वेळ आता येऊन ठेपली की काय असे वाटने साहजीक आहे. [३]

महाराष्ट्रातील काही मोठया धरणांमुळे विस्थापित झालेल्या व काही प्रमाणात पूनर्वसन झालेल्या कुटुंबांची व त्यांच्या समस्यांची स्थिती लक्षात घेतली तर त्याबाबत वरिल प्रमाणे विधान करणे गैर आहे असे कोणताही संवेदनशील माणूस म्हणणार नाही. त्यामुळेच मागच्या तीन चार दशकांपासून संपूर्ण देश विविध धरणग्रस्त प्रकल्पबाधितांच्या जन-आंदोलनांनी ढवळून निघाला आहे. याचे महाराष्ट्रातीलच नव्हे तर बहुधा देशातील पहिले उदाहरण म्हणजे पुणे जिल्हयातील मुळशी धरणाच्या प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या २८ गावांच्या विस्थापन-पुर्नवसनाचा प्रश्न होय. त्यानंतरच्या काळातील ठळक उदाहरणामध्ये कोयणा धरण, कोल्हापूर व सांगली, सातारा जिल्हयातील उरमोडी धरण, म्हसवड धरण, कोल्हापूर व सांगली जिल्हयाच्या सिमेवरील वारणा धरण, बुलढाणा जिल्हयातील जिगांव प्रकल्प, याशिवाय वर्धा-पेंच प्रकल्प, नांदेडचे बाभळी धरण, भंडारा जिल्हयातील गोसी-खुर्दे राष्ट्रीय प्रकल्प, नर्मदा-सरोवर प्रकल्प इत्यादी अशा अनेक लहानमोठया प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील विस्थापित कुटुंबांची संख्या लाखोंच्या घरातील असून त्या कुटुंबांना आपल्या बुडीत क्षेत्राचा (जमीन व घरांचा ) योग्य मोबदला मिळाला नाही. तसेच या प्रत्येक प्रकल्पांना होत असलेली दिरंगाई व त्यातुन वाढत जाणारा खर्च हा प्रकल्प बाधितांच्या जिवावर उठला आहे. तसेच त्यांचे योग्य प्रकारे नियमानुसार पुनर्वसन झालेले नाही असेच चित्र सर्वदूर आहे. त्यांच्या मुलांचे शिक्षण, रोजगार, आरोग्य, उपजिवीका इ. संबधाने अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या मुळे अशा कुटुंबात असंतोष पसरुन एक प्रकारचा आक्रोश त्यांच्या मनात संपूर्ण व्यवस्थेसंबंधी निर्माण होतांना दिसून यतो. धरणग्रस्तांच्या समस्यांचे विदारक व भयावह चित्र देशाच्या व जगाच्या समोर ख-या अर्थने आले ते महाराष्ट्र, गुजरात व मध्येप्रदेशच्या सिमेवरील नर्मदा सरोवर प्रकल्पामुळे एकटया नर्मदा प्रकल्पाची व्याप्ती जवळपास ८०० गावांना बुडवणारी, अफाट जंगलातील अफाट झाडे आपल्या कवेत घेणारी, प्रचंड जैव-विविधतेला मुठमाती देणारी, हजारो मच्छीमार व नदीत दरवर्षी टरबुजांची शेती करणारे कोळी, हजारो शेतकरी व जंगलातील व्यवसायावर उपजीविका करणा-या हजारो बांधवांना विस्थापीत करणारी ठरली . या प्रकल्पाचा १९८३ मधील अंदाजीत खर्च ४,२०० कोटी होता यात नर्मदा नियंत्रण प्राधिकारणाच्या वेबसाईटनुसार (२०१०) ५१,४४७ कुटुंबे प्रकल्पबाधित असून २००८-२००९ च्या अहवालानुसार सर्वांचे पुनर्वसन झालेले आहे परंतु प्रत्यक्षात पुनर्वसीत कुटुंबांची संख्या १०,५०० असून, निमाडच्या मैदानी क्षेत्रात आजही ३८,००० कुटुंबे पुनर्वसनाशिवाय शिल्लक असून गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश अशा तिन्ही राज्यातील आदिवासी क्षेत्रात आजही ३००० कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असल्याचा दावा नर्मदा बचाव आंदोलनकर्त्यांचा आहे. तर वरील प्रमाणे महाराष्ट्रातील इतर प्रकल्पांची अवस्था अशीच असल्या बाबतचा अंदाज आपनास बांधता येईल कारण तशा बातम्या वर्तमान पत्रात येतांना दिसतात.[०४]

कोणत्याही घटकाचा सर्वांगीण आभ्यास करावयाचा झाल्यास आपल्याला त्याच्या समर्थनात तसेच विरोधात जाणारे मुद्दे आभ्यासने आवश्यक वाटते. त्यात **मोठया धरणांच्या समर्थनपर मुद्दे पुढील प्रमाणे मांडता येईल** : मोठी धरणे बांधणा-या देशांमध्ये भारताचा आज वरचा क्रम लागेल. अनेक प्रचंड धरणयोजनांची उभारणी सुरु आहे. संपूर्ण नद्यांना धरणांच्या साखळदंडानी जखडून टाकण्याच्या महत्वाकांक्षी योजना साकार होत आहेत. पुर्वीच्या नियोजन मंडळाच्या (आता निती आयोग) व्याख्येनुसार, लागवडीखालील लाभक्षेत्र १०,००० हेक्टरहून अधिक ज्या योजनेत आहे त्या योजनेला मोठी तर लाभक्षेत्र पाच ते दहा हजार हेक्टरांच्या दरम्यान असल्यास त्या योजनेस मध्यम योजना म्हणतात. म्हणून विकासा साठी अशा

योजनांवर अधिक भरदेण्यात आल्याचे लक्षात येते. मुख्य चार मुद्यांवरुन मोठया धरणांचे समर्थन केले जाते १. अन्नधान्याची गरज भागविण्या साठी सिंचन क्षमता वाढविणे. २. विजेचे उत्पादन ३. औद्योगिकी करणा साठी तसेच घरगुती वापरा साठी ४. नदयांना येणारे पूर नियंत्रण करणे साठी तसेच दुष्काळ निवारण करण्या साठी . वरील चारही मुद्दे मोठया धरणांच्या समर्थनपर जातात. **मोठया धरणांच्या विरोधात जाणारे मुद्दे: -** मोठया धरणांच्या समर्थपर काही मुद्दे येत असली तरी विरोधातील मुद्दे सुध्दा अभ्यासने महत्वाचे आहे. त्या १. सिंचन क्षमतेचा अपुरा वापर २.धरणांचे आयुष्य कमी करणारा गाळ ३. प्रकल्पांना होत असलेली दिरंगाई सतत फुगत जाणारा भांडवली खर्च व वाढत जाणारी तूट ४. अपघातांचा संभव ५. भुकंपाचा धोका ६. वाढत जाणारा पूर नियंत्रणातील धोका ६. पाणलोट व डूब क्षेत्रावर होणारा परीणाम ७. लाभक्षेत्रातील विपरीत परिणाम ८. विस्तापितांचे व पुनर्वसनाचा प्रश्न. ९. पर्यावरणीय परीणाम.[५]

वरील विवेचनाचा विचार करता संशोधना साठी समाजिक आर्थिक परीणामांचा आभ्यास पाडळसे प्रकल्पाच्या निमित्ताने करावे असे वाटले संशोधक विद्यार्थी म्हणून तसेच स्वत: प्रकल्पग्रस्त कुटुंबाचा सदस्य म्हणून धरणांचे समाजिक आर्थिक परीणाम आभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोध निबंधाचा उद्देश:**

१. मोठया धरणांचा आढावा घेणे
२. पाडळसे धरणाचा सामाजिक -आर्थिक परीणाम आभ्यासणे
३. मोठया धरणा संदर्भात उपाययोजन सुचविणे.

**गृहितकृत्ये:-**

सदर संशोधनाला योग्य दिशा देण्यासाठी पुढील गृहितकृत्ये / उपकल्पना मांडण्यात आली आहे.

१. मोठी धरणे मानवी व पर्यावरण विकासास हानीकारक आहेत.
२. पाडळसे धरणांचा सामाजिक आर्थिक दुष्परीणाम आहे.
३. मोठया धरणामुळे विस्थापणाच्या गंभिर समस्या निर्माण होत आहे.

**नमुना निवड पध्दती:**

सदर संशोधन अभ्यासात नमुना निवडीसाठी संशोधकाने साधी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीतील (Simple Random Sampling) नियमित अंकण पध्दती (Regular Marking Method) पध्दतीचा वापर केला आहे. संशोधनाचे भौगिलिक क्षेत्र जळगांव जिल्हयातील निम्न तापी प्रकल्पात बाधित गावे असुन त्यात चोपडा अमळनेर व धरणगांव तालुक्याचा समावेश आहे. जिल्ह्यातील या तीनही तालुक्यात असणाऱ्या प्रकल्प बाधित कुटुंबांचा त्या त्या गावांमधून सामाजिक आर्थिक स्तरांचा विचार करुन प्रत्येक गावातून १० % कुटुंबांची नमुना म्हणून निवड केली आहे. त्यात त्यांच्या ग्रामपंचायत येथून माहिती घेवून प्रत्यक्ष गावात जावून त्या त्या भागातुन नमूना म्हणून मुलाखत अनुसुचि भरुन घेतली. काही गावातील वयोवृध्द शेतकरी शेतमजूर युवक महिला यांच्या सोबत समूह चर्चाकेली.[०५]

**पाडळसरे प्रकल्प - एक दृष्टीक्षेप**

खान्देशातील सर्वात मोठे आणि अवर्षणप्रवण असलेल्या जिल्हयातील सहा तालुक्यांना वरदान ठरणारे तापी नदीवरील पाडळसरे धरण सरकार दरबारी नेहमीच उपेक्षीत आहे. दर सूची नुसार किंमत वाढल्याने गेल्या २१ वर्षात १४२ कोटींचा हा प्रकल्प आता तब्बल २७५१ कोटीपर्यंत येऊन पोहचला आहे. मात्र त्या तुलनेत कधीही निधी मिळाला नाही. पाडळसरे प्रकल्पासाठी हा आकडा ४० ते ५० कोटींच्या वर जात नसल्याने धरणाच्या कामात तसेच पुनर्वसनात मोठया प्रमाणात दिरंगाई झाली आहे. निधी उपलब्धतेचे हे प्रमाण कायम असेच राहिल्यास धरण पूर्ण होण्यास अजून किमान २० वर्षे लागतील.

पाडळसरे प्रकल्पाची मुळ किंमत ते वाढीव किंमत अशी वाढत गेली - ६ मार्च १९९७ रोजी १४२.६४ कोटीची मुळ प्रशासकिय मान्यता मिळाल्यावर ६ एप्रिल १९९९ रोजी सुधारीत मान्यता (किंमत २७३.०८ कोटी), ८ मे २००३ रोजी दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता (किंमत ३९९.४६ काटी), १४ सष्टेंबर २००९ रोजी २००८-०९ चे दरसुची नुसार तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता (११२७.७४ कोटी),२०१७-१८ चे रेडीरेकनर दरसूचीनुसार ५ उपसा सिंचन योजनासह टप्पा १ साठी २७५१.०५ किंमतीला केंद्रीय जल आयोगाने २८ ऑगस्ट २०१८ रोजी मान्यता दिली. निम्न तापी प्रकल्प पाडळसे (ता. अमळनेर) अंतर्गत जिल्हयातील १४ गांवाचे पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. धरणात बुडणा-या पाडळसे ३०० ता. अमळनेर व धुपे १४३ ता. चोपडा अशा दोन गांवाचे पुनर्वसन पूर्ण झालेले आहे. या प्रकल्पांतर्गत सातरी १३३, विचखेडा

१४३, डांगरी १०९२, विटनेर १४०, घाडवेल ४८, नांदेड २०९, वाकळी ३२३, बोहरा १७०, कलाली ७०, बुधगाव २३५ व अनवर्दे ६९ अशा एकुण २ हजार ६३२ कुटुंबांना भूखंड देण्याचे पुर्णवसनाचे काम शिल्लक आहे. प्रकल्पाच्या वाढत जाणा-या किंमती बाबत राज्य शासन कमालीचे उदासीन आहे तर या खर्चामुळे पुनर्वसनाच्या कामात दिरंगाई होत आहे. [०६]

● **पाडळसे प्रकल्पाचे सामाजिक परीणाम :-**

निम्न तापी प्रकल्प पाडळसे अतंर्गत बाधित कुटुंबांचा सामाजिक आर्थिक आभ्यास करतांना प्रकल्प बाधित कुटुंबांना अनेक सामाजिक समस्या जानवत असल्याचे दिसून आले प्रकल्पास होत असलेली दिरंगाई त्यामुळे उशीराने होणारे पूर्नवसन व शासनाने बाधित गावात कोणत्याही विकास कामावर पैसा खर्च न करण्याचे धोरण या कारणाने अनेक बाधित गावे गेली २१ वर्षा पासून आहे त्या स्थितीत राहत आहेत त्यामुळे बाधित गावातील नागरीकांच्या जिवनमानावर त्याचा परीणात दिसून यतो. त्या साठी विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या माध्यमातून तसेच समूह चर्चा व प्रत्यक्ष पाहणी नुसार खालील बाबी दिसून आल्या आहेत.

- प्रकल्पबाधीत गावामध्ये अनेक प्रकारच्या समस्या आहेत त्यातील व्यसनाधिनता हया समस्येचे प्रमाण वाढत असल्याचे समजते व्यसन करणा-या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे.
- व्यसन कशा मुळे करतात त्यात प्रकल्पबाधीत झाल्यामुळे अधिक प्रमाणत व्यसन करत असलेल्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे त्यामुळे निमार्ण होणारा ताण या कारणानाने व्यसन करणा-या निवेदकांची संख्या हि मोठया प्रमाणात आहे
- कुटुंबाचे स्थलांतराचा पुनर्वसनाचा मुलांच्या शिक्षणावर परीणाम होईल झाला का मोठया प्रमाणात परीणाम हाईल अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त असुन त्याचे शे.प्रमाण सर्वात जास्त आहे कारण कुटुंबाच्या संस्थलांतराचा मुलांच्या शिक्षणावर परीणाम झाला आहे अश्या निवेदकांची संख्या हि आहे त्यात काही कुटुंब प्रमुखानी यात नविन घर बाधंकाम स्थलांतर याचा मुलांच्या चालु शैक्षणीक वर्षावर परीणाम होतो असे म्हटले आहे हातात पैसा राहत नाही परीणामी बाहेर गांवी शिक्षणासाठी पाठवता येत नाही परीणामी शिक्षण अर्धवट सोडावे लागले.
- घर प्लॉट अधिग्रहित झाल्या पासुन दुरुस्तीची काम केली आहेत का तर केली नाही अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे. मागील १० वर्षापासुन आहे त्या स्थितीत लोंकाना राहवे लागत आहे घरे पूर्ण पणे मोळकळीस आली आहेत. घरे मातीची (धाब्याची) असणा-या निवेदकांची संख्या मोठी आहे कुटुंबांना आपला जिव मूठीत घेवून राहवे लागत आहे. तसेच संपूर्ण मोळकळीस आलेल्या घरावर खर्च करावाच लागत आहे. खर्च केल्या शिवाय पर्याय नाही असे काही निवेदकांचे म्हणने आहे.
- मागील १० वर्षा पासुन कोणत्या समस्या जानवतात अश्या निवेदकांमध्ये वरील पैकी एकुण उत्पन्ना वर परीनाम झाल्याचे दिसुन येते तसेच भविष्याच्या दृष्ट्रीने मुले बेरोजगार तसेच आळशी होतील अश्या निवेदकांची संख्या सुध्दा अधिक आहे. उपरोक्त समस्यांचा विचार करता निवेदकांच्या आर्थीक सामाजिक जिवनावर प्रकल्पाचा परीणा झाला असल्याचे समजते.
- शासनाच्या दिरंगाई मुळे प्रकल्पास उशीर होत आहे अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे तसेच सरकारी अधिकारी हे सुध्दा दिरंगाईस जबाबदार आहेत अश्या निवेदकांची संख्याही मोठया प्रमाणात आहे याचा अर्थ जास्ती जास्त निवेदक हे शासनास जबाबदार धरत आहेत.
- प्रकल्पबाधित कुटुंबांना अजून मोबदला मिळाला नाही अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त असुन जमिनीचे अधिग्रहंण होवूनही मोबदला मिळाला नाही त्यामुळे अधिकच्या समस्या जानवत आहेत.
- पूर्वी राहत असलेली मंडळी /वाडा/वार्ड संस्कृती चांगली आहे /होती का त्यात जास्तीत जास्त निवेदकांनी होय असे दर्शविले आहे एकूण संपूर्ण आयुष्य वडीलोपार्जीत ज्या गावात गेली त्याच गावात हजारो वर्षा पासुनची नाती गोती आहेत ती एकदम विस्कळीत होणार आहे कारण पूढे शहरी जीवनाचा अनुभव येणार आहे आपले शेजारी शहरा प्रमाणे आपले नसतील का असा प्रश्न कदाचीत या मंडळीनी येत असेल करीता काहीनी आपले घराचे /प्लॉट चे आरक्षण बदलून घेतले आहे भारतात अजूनही जातीचा पगडा मोठया प्रमाणात आहे शिक्षण जरी पूढारले असले तरी भारतीय संस्कृतीचे पाश्च्यातीकरण होण्यास अजून अवधी आहे मिळालेल्या घर प्लॉट जागेचे आरक्षण बदलून घेणे हे

शासनाच्या धोरणा विरुध्द आहे बदलून घेण्याचे अनेक कारणेहि पूढे आली आहेत.

**पाडळसे प्रकल्पाचे आर्थिक परीणाम :-**

- प्रकल्पबाधित कुटुंबांमध्ये रु. २४०००/- पर्यंत उत्पन्न असणा-या निवेदकांची संखा सर्वात जास्त आहे तसेच रु.५ लाखाच्या वर उत्पन्न असणा-या निवेदकांची संख्या कमी आहे. तसेच शेती धरणात गेली असल्याने व शासनाची कार्यबंदी असल्या मुळे शेतीत कोणत्याही प्रकारची सुधारणा करता येत नाही परीणामी उत्पन्न वाढत नाही.
- प्रकल्प बाधित निवेदक कुंटुबाची शेतजमिन साधारण पणे १ ते ५ एकर असणा-या शेक-याची संख्या सर्वात जास्त असुन त्याच पाठोपाठ ६ ते १० एकर असणा-या शेतक-या ंची आहे याचाच अर्थ मध्यम वर्ग शेतकरी मोठया प्रमाणात प्रकल्पबाधित असुन त्यात त्यातील काही कुटुंब भुमिहिन झाले असल्याचे समजते
- कुटुंबाने मागील पाच वर्षात कर्ज घेतले आहे का अश्या निवेदकांची संख्या विशेष आहे कारण प्रकल्पात घर जमिण गेल्या मुळे पैसे मिळणार आहे या अशेने सदर कुटुंबानी अधिकचा खर्च केलेला आहे. त्या कारणाने कर्ज काढून अधिकचा खर्च झालेला असल्याचे दिसुन येते.
- कुटुंबाने मागील पाच वर्षात कर्ज कोणाकडून घेतले आहे त्यात सावकार कडून कर्ज घेणा-यांची संख्या लशात घेण्या सारखी आहे
- कर्ज कोणत्या कारणाने घेतले त्या शेती ,व्यवसाय साठी कर्ज घेणा-या निवेदकांची संख्या सर्वात जास्त असुन मुला/मुलींचे विवाह ,आजारपण, धार्मिक कार्य मुलांच्या शिक्षण या सर्व कारणा साठी कर्ज घेतले असल्याचे निर्देशनात येते.
- कर्जघेवून फेडण्या साठी स्थावर मालमता उदा. घर, जमिन, पाळीव प्राणी इ. विकावे लागले असे म्हणणा-या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे कारण धरणाचा पैसा मिळणार म्हणून अधिक खर्च झाला व घेतलेले कर्ज फेडावे लागले.
- मागील १० वर्षात रोजगारा साठी स्थलांतर करणा-या निवेदकांची संख्या सर्वात जास्त आहे कारण गावे प्रकल्पात जाणार म्हणून कोणत्याही प्रकारची नविन सुधारणा शेती घर इ.क्षेत्रात नाही त्याचा परीणाम मजूरी मिळण्यावर होतो म्हणून स्थलांतर करावे लागते . शेतीची उत्पादकता ही घटल्याचे दिसुन येते.
- शेतीतील बेरोजगारी वाढली आहे अश्या निवेदकांची संख्या मोठया प्रमाणात आहे कारण ज्या भागात मशागत मोठया प्रमाणात होत होती तेथे आता प्रमाण निम्म्यावर आहे तसेच भविष्यात संपूर्ण प्रकल्प कार्यान्वीत झाल्यास कोणत्याच स्वरुपाचे काम असणार नाही त्यासाठी बेरोजगारीचे प्रमाण वाढेल यात शंका नाही.
- प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला मिळाला नाही अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त असुन प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला मिळाल्यास नोकरीच्या तचेस शिक्षणाच्या संदर्भातील लाभ घेता येतील व बेकारीचे प्रमाण कमी होईल.
- प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला मिळविण्या साठी कोणास पैसे दयावे लागले का त्यात दाखला मिळालेल्या प्रकल्पग्रस्त कुटुंबातील ५.०१ % कुटंबांनी पैसा दिला असल्याचे निर्देशनास येत आहे.
- मिळालेल्या मोबदल्यातुन आर्थिक परीस्थितीत कोणताच बदल झालेला नाही अश्या निवेदकांची संख्या सर्वात जास्त अ ाहे कारण मिळणारा मोबदला विविध गरजांवर खर्च होत आहे त्यात नविन ठिकाणी सर्वच गावातील लोक आर.सी.सी. घर बांधत आहेत त्यात आपले घर हि इतरांसारखे असावे या भावने पोटी जास्तीचा अर्ख होतांना दिसुन येतो नविन ठिकाणी जमिन शेताची आहे त्या मुळे पाया जास्त खोल घ्यावा लागतो परीणामी जास्त खर्च होतांना दिसतो .

**समारोप :-**

गेल्या दोन दक्षकात महाराष्ट्राने अनुभवलेला पर्यावरण, निसर्गाचा प्रकोप सर्वांनाच थक्क करणारा आहे (मुंबई २६ जुलै २००५, सांगली कोल्हापूर ऑगस्ट २०१९ , सोलापूर व विदर्भ- २०२०) आम्ही विज्ञाननिष्ठ झालो विकासाची डोलारे घेवून तंत्रज्ञानाच्या लखप्रकाशात आम्हांला पर्यावरणाचा भविष्यातील अंधार दिसत नसेल तर आमच्या सारखे सुशिक्षीत अज्ञानी आम्हीच असे म्हणावयास हरकत नाही. कारण मोठया धरणांना होणारा विरोध आम्हाला लक्षात घ्यावा लागेल. जगभरच धरणांना वाढता विरोध होत आहे. रशियात, अमेरीकेत आणि तिस-या जगात सर्वत्र लोकमताचे

दडपण वाढत आहे. ७ ते ११ जून १९८८ च्या दरम्यान सॅन फ्रान्सिस्कोला झालेल्या आंतरराष्ट्रीय रीव्हर-नेटवर्कच्या संमेलनात २७ देशांच्या प्रतिनिधींनी मोठया धरणांविरुध्द स्पष्टपणे मत नोंदवले व सर्वत्र धरणांची बांधकामे थांबवण्याचे आवाहन केले होते तसेच नर्मदासागर , सरदार सरोवर व टीहरी धरणांबद्दल या संमेलनाने विशेष चिंता व विरोध व्यक्त केला. जूलै १९८८ मध्ये आनंदवन (वरोरा) येथे झालेल्या मोठया धरणांविरुध्दच्या संमेलनात पर्यावरणतज्ज्ञ, पत्रकार, समाजशास्त्रज्ञ, समाजिक कार्यकर्ते इत्यादींनी मोठया धरणांना नि:संदिग्ध व तीव्र विरोध नोंदवला आणि मोठया धरणांच्या योजना तात्काळ स्थगित करण्याचे आवाहन केले.[७]

एवढया व्यापक विरोध का बरे होऊ लोगला आहे. लोक विकासाच्या विरोधी आहेत का ? यांना मानसांपेक्षा झाडांबद्दल आणि पशुपक्ष्यांबद्दल अधिक कळवळा आहे काय ? अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधने गरजेजे वाटते धरणांच्या समर्थनपर होणारा युक्तिवाद , आतापर्यंत हजारो कोटी रुपये धरणप्रकल्पांवर झालेल्या खर्चाचे फलीत, पर्यावरणीय दृष्परिणामांवर दृष्टीक्षेप टाकणे, तसेच फायदया पेक्षा दृष्परिणामांचे पारडे अधिक जड आहे का ? या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करणे आवश्यक नव्हे तर निकडीचे वाटत आहे. भविष्यात आम्हाला सहयोगी समाज निर्माण करायचा असेल तर समाजिक आर्थिक घटकांचा एकत्रित विचार करुण येणा-या सरकारांनी सर्वंकश स्वरुपात महाकाय मोठी धरणे बांधण्याचा अट्टास न धरता शिवारातले पाणी शिवारातच ही मोहीम राबवून लहान लहान धरणांचा विचार करावा व मोठया धरणामूळे होणारी मानवी हक्काची पायमल्ली थांबावी असे या निम्मीताने वाटते .

## संदर्भ


१. मानव अधिकार विस्थापितांच्या व पर्यावरणाच्या समस्या -डॉ. निलकण्ठ भुसारी प्रा.गणेश मालटे प्रा. जे. जे. जाधव. **पुष्ठ क्रं. २८**

२. मोठी धरणे पर्यावरणीय सामाजिक व अर्थिक दुष्पपरिणाम- **परीसर यमुना आय सी एस कॉलनी पुणे.** पराग चोळकर. **पुष्ठ क्रं. ३**

३. मोठी धरणे पर्यावरणीय सामाजिक व अर्थिक दुष्पपरिणाम .. **पुष्ठ क्रं. ४**

४. मानव अधिकार विस्थापितांच्या व पर्यावरणाच्या ...पुष्ठ क्र, ५२,५३

५. प्रा.सुनिल मायी, सामाजिक संशोधन पध्दती डायमंड पब्लीकेशन्स,पुणे -पुष्ठ क्र-७७,७८

६. दैनिक दिव्य मराठी ०५ जानेवारी २०२० ,जळगाव पेज -०५

७. मोठी धरणे पर्यावरणीय सामाजिक व अर्थिक ...**पुष्ठ क्रं. ७**